


प्रिय शेतकरी बधुंनो

आपण आतांपर्यंत बऱ्याच हायब्रीड पिकांविषयीं माहिती घाचली. अन्नधान्याच्या उत्पादनाबरोबर भाजीपाल्याच्या पिकांविषयीं विचार करणें आणि आपल्या ज्ञानांत भर घालणें खात्रीनें उचीत ठरेल.

आपण रोजच्या आहारांत वेगवेगळ्या भाजीपाल्याचा उपयोग करणें हें आरोग्य शास्त्राच्या दृष्टीनें फारच महत्वाचें आहे. मनुष्यानें नेहमीं "समतोल आहार" करावा असें आरोग्य

**लेखक : जे. एच्. ठोंबरे, बी. ए.**

शास्त्र आपणांला शिकवतें. त्या समतोल आहारासाठीं प्रामुख्यानें भाजीपाला पिकवणें हें आपलें काम आहे. त्या दृष्टीनें आज आपण श्रावण घेवड्याविषयीं येथें विचार करूं.

श्रावण घेवडा हें पीक लॅटिन अमेरिकेंतून भारतांत आणलेलें आहे. युद्धकाळांत घेवड्याच्या जाती भारतांत



आणल्या गेल्या. त्यांपैकीं, कांहीं भारतीय हवामानास लागूं पडल्या व आज त्यांचें भारतभर पीक काढलें जात आहे. हें पीक लोकप्रिय बनलें असून थोड्या अवधींत होणाऱ्या भाजीपैकीं आहे. हें पीक अडीच महिन्यांत तयार होतें. घेवड्याच्या कोवळ्या शेंगांची भाजी केली जाते. बियापासून देखील क्वचित भाजी केली जाते.

श्रावण घेवडा हें पीक उष्ण भागांत होणारें पीक आहे. साधारणपणें ५० अंश फॅ. ते ११० अंश फॅ. तपमान असलेल्या भागांत हें पीक उत्तम येतें. ह्या पिकास सुमारें ३० ते ४० इंच पाऊस मानवतो. ह्या पिकानंतर ज्वारीचें पीक चांगलें घेतां येतें. असा बऱ्याच शेतकऱ्याचा अनुभव आहे. श्रावण घेवडा हें प्रामुख्यानें पावसाळी पीक आहे. वैशाख अखेर किंवा आषाढचे सुरुवातीस पेरणी करून तें श्रावणांत तयार होतें म्हणून त्याला "श्रावण घेवडा" हें नांव दिलें गेलें. इंग्रजींत याला फ्रेंच बीन्स म्हणतात. पावसाळ्याप्रमाणें उन्हाळ्यांत देखील हें पीक घेतां येतें. त्यासाठीं त्याला सावलीची जागा हवी असते. उन्हामुळें त्याच्या शेंगा निबर तर उलट साधारण सावलीमुळें मऊ व लुसलुशित राहातात. ऊंसाच्या लागवडीबरोबर ऊंसाच्या सऱ्यामध्यें ह्या पिकाची लागवड करणें इष्ट असून दुहेरी फायदा होतो.

पोयटयाची जमीन ह्या पिकाला चांगली मानवते. अशा पोयटयाच्या जमिनींत पांच ते सहा इंच नांगरणी करून दोन ते तीन पाळ्या द्याव्यात.

# श्रावण घेवडा (फ्रेंच बीन्स)

जमीन शक्यतों सपाट व भुसभुशीत करावी. शेवटच्या पाळीच्या अगोदर १० ते १२ गाड्या शेणखत द्यावें.

श्रावण घेवड्याची पेरणी दोन पद्धतीनें करतां येतें. पाभरीनें अगर टोकण पद्धतीनें. शक्यतों टोकण पद्धत फायदेशीर ठरतें. एकरीं १५ ते २० किलो बीं पेरणीस पुरतें. नंतर विरळणी करून सुमारें ९ ते १२ इंच दोन रोपांत अंतर ठेवावें.

पेरणीसाठीं साधारपणें पुढील सुधारलेल्या जाती वापराव्यात. अ) नंबर ४ ओपन :– ही जात खाण्यास फारच चवदार असून बरीच लोकप्रिय आहे. शेंगा गुळगुळीत, मऊ, आणि सोनेरी रंगाच्या असतात. बियांचा दाणा पिवळसर असतो. ही जात पुणें, अहमदनगर, ह्या जिल्ह्यांत योग्य ठरली आहे.

ब) पेन्सिलपाड नं. ५८ ही जात खाण्यास चवदार असून तिच्या शेंगा गोल, लांब, मांसळ आणि रंगानें फिक्कट हिरव्या असतात. बीं चॉकलेटी रंगाचें असतें अहमदनगर जिल्ह्यांत ही जात फारच लोकप्रिय ठरली आहे.

क) नंबर ३४–ए. ह्या जातीचें बीं रंगानें पांढरें असतें. शेंगा चापट असतात. ही जात बरीच लोकप्रिय आहे.

पेरणीनंतर १५ दिवसांनीं पिकाची विरळणी करावी एक दोन वेळां निंदणी करावी. पिकाची जोरदार वाढ होत असल्यास वाढीबरोबर कोणतेंच खत देण्याची जरूरी नाहीं. परंतु जमीन नापीक असल्यास आणि पिकाची वाढ बरोबर होत नसल्यास पेरणीनंतर सुमारें तीन आठवड्यांनीं दर एकरी २५ किलो आमोनियम सल्फेट देणें आवश्यक आहे. श्रावण घेवडा हें पीक मिश्र पीक म्हणून घेतां येतें ज्याप्रमाणें आपण कोथंबीर, मका, गवार, भेंडी, ही मिश्र पिकें घेतो त्याप्रमाणें हें पीक घेतां येतें. सुरूं ऊंसांतही हें पीक घेणें इष्ट असतें.

शेंगांची पूर्ण वाढ झाल्यावर, परंतु दाणा फुगीर होण्याच्या आधीं शेंगा तोडाव्यात. शेंगा तोडण्याचें काम फार काळजीपूर्वक करावें लागतें. शेंगा तयार होण्याचीं चिन्हें दिसूं लागतांच शेंग उघडून पहावी. दोन दाण्यांमधील भाग सपाट झाल्यास शेंगा तोडणीवर आल्या असें समजावें. त्यानंतर शेंगा तोडल्यास निबर होतात आणि बाजारांत निबर शेंगांना मागणी नसते. भाव सांपडत नाहीं व मग शेतकरी नाराज होतो. करितां शेंगांची तोडणी ही गोष्ट फारच महत्त्वाची समजली पाहिजे. तोडणी दररोज शेंगा मागें न ठेवतां करावी. दिवसाआड तोडणी केली तरी चालते. एकूण पांच ते सहा तोडण्या मिळतात. आणि एकरीं २,५०० ते ३००० किलो उत्पन्न मिळतें. शेंगा तयार झाल्याची एक सोपी व साधी खूण म्हणजे शेंग बोटांत धरून मुडपल्या तर त्यांचे ताबडतोब दोन तुकडे झाले पाहिजेत.

बीं धरावयाचें झाल्यास पिकाचा कांहीं भाग राखून ठेवावा. शेंगा पक्क्या व सुकल्यावरच तोडाव्यात. नंतर त्या वाळवाव्यात. काठीनें वाळलेल्या शेंगा बडवून बीं मोकळें करावें. एकरीं सुमारें २५० ते ३०० किलो बीं मिळतें. पेरणीसाठीं बीं ठेवावयाचें झाल्यास बियांस कोठारांत कीड लागते तेव्हां बियांसाठीं वाळलेल्या शेंगा राखून ठेवाव्यात आणि पेरणीच्या वेळीं बीं तयार करावें. अशी पद्धत सर्वत्र बहुतेक पाळली जाते. अशा पद्धतीनेंसुद्धां ठेवलेल्या शेंगांना देखील कीड लागतेच. म्हणून बीं काढून तें पूर्णपणें वाळवून त्याला 'गॅमॅक्सिन' नांवाचें औषध लावून सांठवावें म्हणजे कीड लागत नाहीं.

हें पीक साधारणपणें खालील रोगाला बळी पडते.

१) व्हायरस :– शिरा पिवळ्या पडणें वाढ खुंटणें, फलधारणा न होणें, लागलेल्या शेंगांची वाढ न होणें, इत्यादी लक्षणें ह्या रोगाचीं आहेत. ह्या रोगावर कांहींही उपाय नाहीं. त्यासाठीं रोगट झाडें उपटून नष्ट करावींत. म्हणजे रोगाचा फैलाव होत नाहीं.

२) मर :– हा रोग जमिनींतून पसरतो. त्यामुळें त्याच त्याच जमिनींत हें पीक घेऊं नये म्हणजे हें पीक 'मर' रोगाला बळी पडण्याची शक्यता कमी होईल.

गांवठी जातीचें उत्पन्न कधीं कधीं जास्त मिळत असलें तरी गांवठी शेंगा चवीला चांगल्या नसल्या कारणानें सुधारलेल्या जातीची लागवड करणें फायदेशीर ठरतें. वरील सुधारलेल्या जातीचें बीं शेतकी खातें, महाराष्ट्र राज्य, पुणें ५ यांच्याकडून मिळूं शकतें.

शेतकऱ्यांनो, ह्या सुधारलेल्या जातींची लागवड तुम्ही अवश्य करावी. त्यामुळें स्वत:ला वैयक्तिकही फायदा मिळेल व समाजाला देखील आपल्या समतोल आहारांत उत्तम प्रकारची चवदार भाजी खाण्याची संधी उपलब्ध होईल आणि आपण कांहीं तरी समाजसेवा केल्याचें समाधान तुम्हांला लाभेल. ••

**कोल्हापुरी दणका–** लेखक : शरद कारखानीस

# स्वस्ताईची कमाल, पी. एल. ४८०

केवळ कोल्हापूरच नव्हें तर आज भारतांत सर्वत्रच पी. एल. ४८० फार स्वस्त झालेलें दिसतें. काय म्हणतां, तुमच्या बोलण्याला आधार काय? मग जरा कोल्हापूरच्या रेल्वे स्टेशनवर टाका पाहूं चक्कर आणि डोळे उघडून जरा नीट पहा काय दिसतें तें! काय म्हणालात दुर्गंधी कसलीं येतें? राजाजी ये भी तो एक पॉईंट है. समजलं नाहीं? अशी ही दुर्गंधी आहे कुजलेल्या धान्याचीं! आणि ही पोतीं दिसतांत ना तीं आहेत धान्याचीं! पर्जन्यराजानें या धान्यांच्या पोत्यांना अभ्यंगस्नान घातलं आहे आणि आतांही तो अभिषेक सुरूं आहेच!

**हमालही हात लावीनात।**

अन्नधान्य उत्पादन वाढवा, अन्न काटकसरीनें वापरा, मेजवान्या टाळा, अन्नाची नासाडी करूं नका' अशा प्रकारचा सदुपदेश आपल्याला नेहमीच पंतप्रधानापासून ते झेड. पी. च्या अध्यक्षापर्यंत सर्वजण नेहमी करीत असतात. त्यांचा हा उपदेश वाईट असतो, त्यांत कांहीं तथ्य नसतें अशातला भाग नाहीं; पण जेव्हां ही सरकारी मंडळीं उपदेशांचें डोस देत असतात त्याचवेळीं सरकारी यंत्रणेचा उंदीर धान्यपोतीं कुरतडत असतो, उघड्या वाघिणीतून येणारें धान्य पावसानें भिजत असतें, त्याला मोड येत असतात, कुजत असतें, दुर्गंधी सुटत असते आणि मग असला हा घाणेरडा माल उतरून घ्यायला कितीही पैसे दिले तरी हमाल मिळत नाहींत अशी अवस्था होते.

**उचल वेगानें झाली नाहीं।**

कोल्हापूरच्या रेल्वे स्टेशनवर जवळजवळ एक हजार पोतीं धान्य आतां भिजत पडलें आहे. त्याचा मामला थोडा वेगळा आहे. हें धान्य उघड्या वाघीणींतून आलें पण येथें पोहोंचेपर्यंत तें फारसें भिजलें नव्हतें. हें धान्य रेल्वेनें उतरून घेतलें. धान्याची टंचाई एवढीं असते कीं रेल्वेला हें धान्य स्वत:च्या गोडाऊनमध्यें ठेवण्याचीच जरूर वाटत नाहीं. हुंडेकऱ्यांचें ट्रक लागलेलेच असतात. वाघीणींतून सरळ ट्रकमध्यें तें भरलें जातें पण यावेळीं कोल्हापूरच्या धान्य पुरवठा खात्याला त्याचीं अर्जन्सी वाटत नसावीं. बरेंच धान्य येऊनही केवळ नऊ ट्रक्स त्याची वाहतूक करीत होते. बाकीचें धान्य रुळाजवळच्या भागांत पोत्यांची थप्पी लावून पडलीं होतीं अर्थात् ते रेल्वेच्या हद्दींत असल्यानें डेमरेज म्हणून सरकारकडून हजारों रुपये मिळणार हें उघड आहे. आतां यात दोष कोणाचा? सरकारी धान्य लवकर उचललें जाणार या आशेवर बसलेल्या रेल्वेचा कीं योग्यवेळीं ते उचललें नाहीं त्या धान्य पुरवठा खात्याचा? रेल्वेनें वास्तविक धान्य उतरून ठेवण्यासाठीं शेडवजा गोडाऊन बांधायला नको काय? पावसाळ्याचे दिवस आहेत आणि रेल्वेकडें शेडही नाहीं हें माहीत असूनही धान्य पुरवठा खात्यानें धान्याची उचल वेगानें करावयास नको काय?

**सरकारचा खोटा खुलासा।**

कांहीं दिवसांपूर्वींच धान्य पावसांत भिजतें आहे अशी तक्रार राधानगरीचे आम. गोविंदराव कलिकते यांनीं धान्य पुरवठा खात्याकडें केली. पण धान्य पुरवठा खातें आणि प्रसिद्धी खात्यानें त्याचा जाहीर इन्कार केला. त्यांवर आम. कलिकते यांनीं पत्रकारांना नेऊन वस्तुस्थिती दाखवली आणि खोटा खुलासा करून पांघरूण घालण्याचा प्रयत्न फसला. सरकारी खुलासे कसे असतात याचा हा एक नमूना ठरावा।

**बूमरँग उलटला।**

आतां या प्रकरणाचे पडसाद विधानसभा आणि राज्यसभेंतही उठले आहेत. या खुलाशांतीलही विसंगती लक्षांत घेण्यासारखीं आहे. राज्यसभेंत बोलतांना अन्नखात्याचे राज्यमंत्री अण्णासाहेब शिंदे म्हणतात कीं, हरियानांत गव्हाची अभूतपूर्व वसुली झाल्यानें धोका पत्करून आम्हीं आम्ही उघड्या वाघीणीतून वाहतुकीस परवानगी दिली. तर राज्य विधानसभेंत पुरवठामंत्री हरिभाऊ वर्तक म्हणतात कीं, रेल्वेच्या हलगर्जीपणानें अडीच हजार पोतीं गहूं खराब झाला. पण कोल्हापूरला सरकारी खात्यानें या बोटावरील थुंकी या बोटावर करावयाचा प्रयत्न कां करावा? आमदार आणि पत्रकार यांच्या जागरूकतेमुळें हा बूमरँग उलटला आहे हें मात्र खरें! मग आतां तुम्हीच सांगा स्वस्ताईची कमाल आहे कीं नाहीं? पी. एल. ४८० झिंदाबाद!

**कोयनेचा धोका:**

**गांवें ओस पडलीं!**

यंदां वरुणराजाची फारशीं कृपादृष्टी कोल्हापूरवर दिसत नाहीं. यावेळपर्यंत वीस इंचावर पाऊस व्हायचा. पण तरणा संपला आणि म्हाताऱ्याला धांप लागलीं तरी अजून पावसाला तोंड लागलं नाहीं. त्यामुळें शेतकरी गुदस्ताच्या कर्जांत औंदाचें

# नदी पाहिजे? दिली!

भर किती पडणार याचा विचार करूं लागला आहे. शिरोळ तालुक्यांत मात्र परिस्थिती याहून वेगळी आणि भयानक आहे! कोयनेचं धरण फुटणार नाहीं असं किती जरी मंत्र्यांनीं आणि अधिकाऱ्यांनीं सांगितलं तरी शिरोळ तालुक्यांतील गांवें ओस पडूं लागलीं आहेत. ज्या माळावर थोडीफार माणसें दिसतात तीं पाऊस सुरूं होतांच हलणार आहेत. शेतकऱ्यांचें शेतीकडे लक्ष नसल्यानें मजुरांना मजुरी मिळत नाहीं आणि उपासमार घडत आहे. कोयनेच्या भूकंपाचें भूत आमच्या मानगुटीवर पुरतें बसलें आहे!

**नदी पाहिजे? दिली!**

जिल्हा परिषद अध्यक्ष दिनकरराव यादव यांच्याकडें एका गांवचें शिष्टमंडळ आलें आणि आपल्या मागण्यांची पार्श्वभूमी तयार करण्यासाठीं भौगोलिक परिस्थिती सांगूं लागलें.

'...आणि साहेब आमच्या गांवाला नदी नाहीं.'

हें ऐकतांच दिनकरराव म्हणाले 'हत्तेच्या, एवढंच ना! नदी पाहिजे तर दिली! औंदाच्या बजेटांत करून घेतों. जावा कसं आतां!' ••